Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ४०] शनिवार, नोव्हेंबर १९, २०२२/कार्तिक २८, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ६२.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५३०.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**आदेश**

क्रमांक कावि-अ.का.ग्राप.नि.-कक्ष- १५-३२३८-२०२२-

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासकीय अधिसूचना, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक कक्ष अधिकारी, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. जिपनि- २०२१-प्र.क्र. २१८-पं.रा.-२, दिनांक ४ ऑक्टोबर २०२२ अधिसूचने अन्वये बुलढाणा जिल्ह्याच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समित्यांकरीता त्यांना सद्यःस्थितीत लागू असलेल्या सभापती पदाच्या आरक्षणाच्या मुदतीच्या समाप्ती नंतर लगेच येणा-या दिवसापासून सुरू होणा-या अडीच वर्षाच्या कालावधीकरीता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यामधील (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) आणि (अशा जाती, जमाती अणि नागरिकांचा मागासवर्गाच्या प्रवर्ग यामधील महिलासंह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या बुलडाणा जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभापतीच्या पदांची संख्या विर्निदीष्ट केली आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती ) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती ) (पदाचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ च्या नियम २- फ च्या उप-कलम २(अ), २(ब), ३(अ), ३(ब), ४(अ), ४(ब) व ५(अ), ५ (ब) नुसार मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी, डॉ. ह. पि. तुम्मोड, जिल्हाधिकारी बुलढाणा या आदेशाव्दारे बुलढाणा जिल्ह्याच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समित्यांकरीता त्यांना सद्यःस्थितीत लागू असलेल्या सभापती पदाच्या आरक्षणाची मुदत समाप्ती नंतर लगेच येणा-या दिवसापासुन सुरु होणा-या अडीच वर्षाच्या कालावधीकरीता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) आणि (अशा जाती, जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यामधील महिलांसह ) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या बुलढाणा जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या खालील

अनुसूचीमध्ये दर्शविलेल्या प्रमाणे बुलढाणा जिल्ह्यातील पंचायत समिती निहाय सभापती पदाचे आरक्षण निश्चित करीत आहे.

**अनुसूची**

| अ.क्र. | पंचायत समितीचे नांव | | सभापती पद ज्या प्रवर्गासाठी आरक्षित केले तो प्रवर्ग |
|---|---|---|---|
| (१) | (२) | | (३) |
| १ | बुलढाणा | . . | अनुसूचित जाती |
| २ | नांदुरा | . . | अनुसूचित जाती (महिला) |
| ३ | मोताळा | . . | अनुसूचित जाती |
| ४ | चिखली | . . | अनुसूचित जमाती (महिला) |
| ५ | खामगांव | . . | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| ६ | मेहकर | . . | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| ७ | शेगांव | . . | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| ८ | देऊळगांव राजा | . . | सर्वसाधारण (महिला) |
| ९ | लोणार | . . | सर्वसाधारण (महिला) |
| १० | सिंदखेड राजा | . . | सर्वसाधारण |
| ११ | मलकापूर | . . | सर्वसाधारण |
| १२ | जळगांव जामोद | . . | सर्वसाधारण (महिला) |
| १३ | संग्रामपूर | . . | सर्वसाधारण |

**डॉ. ह. पि. तुम्मोड,**

बुलढाणा :
दिनांक : १७ नोव्हेंबर २०२२.

जिल्हाधिकारी,
बुलढाणा,

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.